जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 MAR 2021 सकाळ

विद्यापीठ परिसरात ११५ पक्ष्यांचा वावर

डॉ. गायकवाड; 'बर्डस् ऑन शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस'चे प्रकाशन

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाच्या 'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम'अंतर्गत प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. एस. एम. गायकवाड यांनी दोन वर्षांतील विद्यापीठ परिसरातील जैवविविधतेच्या संशोधनातून 'बर्डस ऑन शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस' कॉफीटेबल बुक साकारले आहे. ते सुमारे ११८ पानांचे असून, सर्वसाधारण व दुर्मिळ अशा ११५ पक्ष्यांची नोंद आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आज प्रकाशन झाले.

शिक्षक, संशोधक, विद्यार्थी यांना संशोधनास प्रोत्साहित करण्यासाठी विविध संशोधन योजना जाहीर केल्या. त्यापैकी 'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम' अंतर्गत डॉ. गायकवाड यांनी विद्यापीठाच्या ८५३ एकर परिसरामध्ये पक्षीनिरीक्षण केले. विशेषतः कोविड-१९ मार्चोच्या

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. एस. एम. गायकवाड यांच्या 'बर्डस् ऑन शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस' कॉफीटेबल बुकचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

> विद्यापीठाने प्रोत्साहन निधी दिल्यानेच विद्यापीठ परिसरातील जैवविविधतेबाबत संशोधन करता येऊ शकले. त्यातूनच परिसरात पक्ष्यांच्या सुमारे ११५ प्रजाती असल्याचे निरीक्षण नोंदविता आले. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रोत्साहन आणि डॉ. व्ही. एस. मने यांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले.
> – डॉ. एस. एम. गायकवाड

कालखंडात विद्यापीठ परिसरात मनुष्य हस्तक्षेप अत्यल्प असल्याचा लाभ घेऊन पक्ष्यांचे निरीक्षण करणे, त्यांची छायाचित्रे टिपणे या गोष्टी केल्या. त्यांनी ११५ पक्ष्यांची अत्यंत तांत्रिक छायाचित्रेही टिपली आहेत. या छायाचित्रांच्या कॉफी टेबल बुकमध्ये पक्ष्याचे छायाचित्र, त्याची थोडक्यात माहिती आणि जिज्ञासूंना अधिक माहिती प्राप्त करण्यासाठी प्रत्येक पक्ष्याच्या पृष्ठावर एक क्यूआर कोड छापला आहे. ज्यायोगे अधिक माहिती घ्यावयाची असेल, त्याने क्यूआर कोड स्कॅन केला की, लगेच पक्ष्याची माहिती त्यांच्या मोबाईलवर दिसेल. त्यांना विद्यापीठाच्या ज्या परिसरात जे पक्षी आढळले, त्या ठिकाणी संबंधित पक्ष्याचा सचित्र माहितीफलकही उभारला आहे. त्यामुळे परिसरात फिरावयास येणाऱ्या नागरिकांनाही कोणत्या पक्ष्याचा आढळ होऊ शकतो, याचा अंदाज येण्यास मदत होते. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत, डॉ. व्ही. एस. मने, डॉ. एम. व्ही. वाळवेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2021

लोकमत

शिवाजी विद्यापीठात गुरुवारी डॉ. एस. एम. गायकवाड यांच्या 'बर्ड्स ऑन शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी पी. एस. पाटील, विलास नांदवडेकर, आर. के. कामत, आदी उपस्थित होते

'बर्ड्स ऑन युनिव्हर्सिटी'तून जैवविविधतेचे दर्शन

संशोधनातून साकारले कॉफी टेबल बुक

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम'अंतर्गत प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. एस. एम. गायकवाड यांनी सुमारे दोन वर्षे विद्यापीठ परिसरातील जैवविविधतेबाबत संशोधन केले. त्यातून 'बर्ड्स ऑन शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस' हे सुमारे ११८ पानी कॉफी टेबल बुक साकारले आहे.

या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठाचा परिसर हा निसर्गरम्य आणि देखणा तर आहेच, पण त्याचबरोबर विविध पशुपक्ष्यांसाठी सुरक्षित अधिवास असल्याचे डॉ. गायकवाड यांच्या संशोधनातून सिद्ध झाले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.डी. नांदवडेकर, डॉ. आर.के. कामत, व्ही.एस. मन्ने, एम.व्ही. वाळवेकर उपस्थित होते. दरम्यान, विद्यापीठाच्या ८५३ एकर परिसरामध्ये सातत्याने पक्षीनिरीक्षण करून डॉ. गायकवाड यांनी दुर्मीळ अशा सुमारे ११५ पक्षी असल्याचे नोंदविले आहे. त्यांची छायाचित्रेही टिपली. या छायाचित्रांचे कॉफी टेबल बुक त्यांनी साकारले आहे. डॉ. गायकवाड यांना विद्यापीठाच्या ज्या परिसरात जे पक्षी आढळले, त्या ठिकाणी संबंधित पक्ष्याचा सचित्र माहिती फलकही उभारला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2021

पुण्यनगरी

संशोधन योजनेतून साकारले विद्यापीठातील पक्षीजगत

कोल्हापूर - शिवाजी विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत शिक्षक, संशोधक, विद्यार्थ्यांना संशोधनास प्रोत्साहित करण्यासाठी विविध संशोधन योजना जाहीर केल्या. त्यापैकीच असलेल्या "रिसर्च स्ट्रेन्थनिंग स्कीम' अंतर्गत प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. एस. एम. गायकवाड यांनी सुमारे दोन वर्षे शिवाजी विद्यापीठ परिसरातील जैवविविधतेबाबत संशोधन केले. त्यातून 'बर्डस् ऑन शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस' हे सुमारे ११८ पानी कॉफीटेबल बुक साकार झाले आहे. डॉ. एस. एम. गायकवाड यांनी दोन वर्षांमध्ये विद्यापीठाच्या ८५३ एकर परिसरामध्ये सातत्याने पक्षीनिरीक्षण केले. विशेषतः कोविड-१९ साथीच्या कालखंडात विद्यापीठ परिसरात मनुष्य हस्तक्षेप अत्यल्प असल्याचा लाभ घेऊन निर्भयपणे मुक्त विहार करणाऱ्या पक्ष्यांचे निरीक्षण करणे, त्यांची छायाचित्रे टिपणे या गोष्टी डॉ. गायकवाड यांना अधिक चांगल्या प्रकारे करता आल्या. त्यांनी सर्वसाधारण व दुर्मीळ अशा सर्व प्रकारचे मिळून सुमारे ११५ पक्षी असल्याचे नोंदविले आहे. या ११५ पक्ष्यांची डॉ. गायकवाड यांनी अत्यंत उत्कृष्ट छायाचित्रेही टिपली आहेत. या छायाचित्रांचे कॉफीटेबल बुक त्यांनी साकारले आहे. यामध्ये पक्ष्यांचे छायाचित्र, त्याची बोडक्यात माहिती आणि जिज्ञासूंना अधिक माहिती प्राप्त करण्यासाठी प्रत्येक पक्ष्याच्या पृष्ठावर एक क्यूआर कोड छापला आहे. ज्याला अधिक माहिती घ्यावयाची असेल, त्याने क्यूआर कोड स्कॅन केला की, लगेच त्या पक्ष्याची सविस्तर माहिती त्यांच्या मोबाईलवर दिसेल. डॉ. गायकवाड यांना विद्यापीठाच्या ज्या परिसरात जे पक्षी आढळले, त्या ठिकाणी संबंधित पक्ष्याचा सचित्र माहितीफलकही उभारण्यात आला आहे. त्यामुळे फिरावयास येणाऱ्या नागरिकांनाही त्या परिसरात कोणत्या पक्ष्याचा आढळ होऊ शकतो, याचा अंदाज येण्यास मदत होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 MAR 2021
सकाळ

पंचगंगेचा पूरधोका नकाशांद्वारे मांडणारे ठरले मॅपाथोन चॅम्पियन

प्रा. डॉ. सचिन पन्हाळकर, अभिजित पाटील, सुधीर पोवार यांचा सन्मान

[illegible]

पान ११ वर ➤

[illegible]

अशी होती स्पर्धा आणि उद्दिष्टे

[illegible]

पंचगंगेचा पूरधोका नकाशांद्वारे मांडणारे ठरले मॅपाथोन चॅम्पियन

➤ पान १ वरून

स्पर्धेसाठी डॉ. पन्हाळकर व त्यांच्या पथकाने 'फ्लड रिस्क असेसमेंट ऑफ पंचगंगा रिव्हर आणि लँडसाईड रिस्क असेसमेंट ऑफ एसडब्ल्यू महाराष्ट्र' असे विषय निवडले होते. यातून त्यांनी कोल्हापूर व परिसरातील स्थानिक भौगोलिक समस्या नकाशांमधून सादर केल्या. कोल्हापूरजवळून वाहणाऱ्या पंचगंगा नदीला येणाऱ्या पुराचा रिस्क झोन नकाशा उपग्रहीय माहिती व जीआयएस सॉफ्टवेअरचा वापर करून तयार केला. कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यादरम्यान असणाऱ्या पश्चिम घाटातील रस्त्यांवर होणारे भूस्खलनही नकाशांद्वारे डॉ. पन्हाळकर आणि त्यांच्या पथकाने सादर केले. या नकाशांसाठी प्रथमच भूगोल अधिविभागाने बारकोड प्रणालीचा उत्तम प्रकारे वापर केला. नकाशावरील बारकोड स्कॅन करताच मॅपमधील माहिती मोबाइलमध्ये असणाऱ्या गुगलमॅपवर दिसेल, अशाप्रकारचे तंत्रज्ञान नकाशामधून सादर केले आहे. याचा वापर या भागातील लोकवस्ती व प्रशासकीय अधिकारी यांना आपत्ती व्यवस्थापनासाठी होऊ शकतो. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी या यशाबद्दल डॉ. पन्हाळकर, अभिजित पाटील, सुधीर पोवार व संजय शिंदे यांचा सत्कार केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2021

तरुण भारत

राष्ट्रीय मॅपथॉन चॅम्पियनशिपमध्ये शिवाजी विद्यापीठ अव्वल

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई, भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) व ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेकनिकल एज्युकेशन या राष्ट्रीय संस्थांमार्फत आयोजित राष्ट्रीय मॅपाथोन चॅम्पियनशिपमध्ये शिवाजी विद्यापीठ अव्वल आले आहे. शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागातील डॉ. सचिन पन्हाळकर, अभिजित पाटील, सुधीर पोवार यांच्यासह रत्नागिरीचे अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे यांना 'मॅपथॉन चॅम्पियनशिप' या अवार्डने सन्मानित करण्यात आले.

या मॅपिंगसाठीच्या स्पर्धेचा निकाल फेब्रुवारीमध्ये जाहीर करण्यात आला. या स्पर्धेसाठी देशभरातून वेगवेगळ्या संस्थांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. या स्पर्धेसाठी ५२२८ रजिस्ट्रेशन करण्यात आले होते. यातून फक्त २५ स्पर्धकांची राष्ट्रीय मॅपाथोन चॅम्पियन म्हणून निवड करण्यात आली. स्पर्धेत भाग घेतलेल्या शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागातील शिक्षक डॉ. सचिन पन्हाळकर, अभिजित पाटील, सुधीर पोवार तसेच रत्नागिरीचे अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे यांना 'मॅपथॉन चॅपियनशिप' अवार्डने सन्मानित केले.

मॅपाथोन हि एक विशिष्ट स्थानबद्ध समस्येवर उपाययोजनेसाठी घेण्यात आलेली राष्ट्रीय स्तरावरील मॅपिंग स्पर्धा आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्थेने संशोधनाकरिता भारतीय उपग्रहांनी घेतलेली माहिती, भुवन, एनआरएसी प्लॅटफॉर्मवरून उपलब्ध करून दिलेली आहे. या माहितीमध्ये भारतीय संसाधने, शेती, हवामान, आपत्ती व्यवस्थापन, ग्रामीण व शहरी नियोजन आणि भविष्यातील विकासाचे मार्ग ओळखण्याची प्रचंड क्षमता आहे. आत्मनिर्भर भारत या राष्ट्रीय कार्यक्रमाच्या अनुषंगाने या स्पर्धेसाठी फक्त भारतीय उपग्रहीय व अनुशांधिक माहितीचा वापर करणे अनिवार्य होते. यातून भारतीय अवकाश संशोधनाचे आत्मनिर्भर भारतीय रिमोट सेन्सिंग डेटाची क्षमता समजून घेणे आणि ओपन सोर्से सॉफ्टवेअरचा वापर करून भारतीय विभागांसाठी अत्याधुनिक नकाशे तयार करणे हे या स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2021
पुढारी

शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात 'इस्त्रो'चा तुरा

मॅपाथोन स्पर्धेत अप्पर जिल्हाधिकारी शिंदे यांच्यासह चौघांची राष्ट्रीय चॅम्पियन म्हणून निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई, भारतीय अंतराळ संशोधन संस्था व ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन या राष्ट्रीय संस्थांच्या वतीने आयोजित केलेल्या मॅपाथोन या मॅपिंगसाठी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत 'मॅपाथोन चॅम्पियन' म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या चौघांची निवड झाली आहे. यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात इस्रोचा तुरा खोवला आहे.

स्पर्धेसाठी देशभरातून ५२२८ स्पर्धक सहभागी झाले. त्यातील अंतिम २५ स्पर्धकांची राष्ट्रीय 'मॅपाथोन चम्पियन' म्हणून निवड केली. यामध्ये रत्नागिरीचे अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे, विद्यापीठाच्या भूगोल विभागाचे डॉ. सचिन पन्हाळकर, अभिजित पाटील व सुधीर पोवार यांचा समावेश आहे. विशिष्ट स्थानबद्ध समस्येवर उपाययोजनेसाठी ही मॅपिंग स्पर्धा घेण्यात आली. याकरिता भारतीय अवकाश संशोधन संस्थेने भारतीय उपग्रहांनी घेतलेल्या माहितीचा वापर अनिवार्य होता. भारतीय रिमोट सेन्सिंग डेटाची क्षमता समजून घेणे आणि ओपन सोर्स सॉफ्टवेअरचा वापर करून अत्याधुनिक नकाशे तयार करणे हे स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट होते. स्पर्धेसाठी डॉ. पन्हाळकर यांच्या पथकाचे 'फ्लड रिस्क असेसमेंट ऑफ पंचगंगा रिवर' आणि 'लँडस्लाईड रिस्क असेसमेंट ऑफ साऊथ वेस्ट महाराष्ट्र' हे विषय होते. पंचगंगेला येणाऱ्या पुराचा रिस्क झोन नकाशा उपग्रहीय माहिती व जीआयएस सॉफ्टवेअरचा वापर करून तयार केला. कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यादरम्यान असणाऱ्या पश्चिम घाटातील घाटरस्त्यांवर होणारे भूस्खलनही नकाशांद्वारे सादर केले.

याकरिता प्रथमच भूगोल अधिविभागाने बारकोड प्रणालीचा वापर केला. नकाशावरील बारकोड स्कॅन करताच मॅपमधील माहिती मोबाईलमध्ये असणाऱ्या गुगलमॅप वरती दिसेल, अशा प्रकारचे तंत्रज्ञान नकाशामधून सादर केले आहे. याचा वापर या घाटातील लोकवस्ती व प्रशासकीय अधिकारी यांना आपत्ती व्यवस्थापनासाठी होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 MAR 2021

तरुण भारत

गुणवत्ता हमी कक्षाचे 'नॅक'ने केले कौतुक

दर्जेदार संशोधन, अभ्यासक्रम, विस्तार कार्य पध्दत, प्रशासन, सामाजिक कार्य आदींचा समावेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात गेल्या तीन दिवसापासून नॅक मूल्यांकनाचे काम सुरू होते. नॅक पिअर कमिटीचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शर्मा यांच्यासह सहा सदस्यीय समितीने विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे विशेष कौतुक केले. अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन, संशोधनाचा दर्जा अतिउच्च पातळीचा असल्याचे सांगितले. तसेच विद्यापीठ प्रशासन व विस्तार कार्याबद्दलही गौरोद्गार काढले.

विद्यापीठातील प्रत्येक विभागातील एका विद्यार्थ्याला गोल्डन जुबली रिसर्च स्कॉलरशिप दिली जाते. विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची गोडी निर्माण करण्यासाठी संशोधन प्रोत्साहन अनुदान दिले जाते. शहीद जवानांच्या वीर पत्नी व मुलांना मोफत शिक्षण, राहण्याची मोफत सोय केली जाते. पूरासारख्या आपत्तीमध्ये विद्यापीठाने पूरग्रस्त महाविद्यालयांना ४४ लाख रूपयांची

मदत केली. परदेशी विद्यार्थ्यांसाठी कमी दरात राहण्याची व शिक्षणाची, संशोधनाची सोय केली आहे. विद्यापीठ अधिविभागातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन अनुदान दिले जाते. छत्रपती शाहू महाराज अध्यासन व छत्रपती संभाजी महाराज रिसर्च सेंटरच्या माध्यमातून ऐतिहासिक गोष्टींचे संवर्धन व संशोधन केले जात आहे. शिवसहाय्यता कक्षातर्फे पूरग्रस्तांना राहण्याची व जेवणाची सोय, शहरातील लोकांना पिण्याचे व वापराचे पाणी पुरवले. जनावरांना चारा पुरवला. तसेच

कमवा व शिका योजनेसह जैवविविधतेचे विशेष कौतुक

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी कमवा व शिका योजनेत काम करून शिक्षण घेतात. या योजनेतून वसतिगृहातील मेस चालवतात, प्रशासकीय काम, माळी काम आदी कामे करतात. विद्यापीठ परिसरातील जैवविविधता संवर्धनाचे काम विद्यापीठ स्वनिधीतून करीत आहे. त्यामुळे विद्यापीठ हे ऑक्सीजन पार्क म्हणून ओळखले जाते. याचे विशेष कौतुक नॅक कमिटीने केले.

कोरोना काळात विद्यापीठ वसतिगृह कोरोना उपचार केंद्रासाठी दिली. विद्यापीठाने यासारख्या अन्य सामाजिक कामे केली आहेत. यासह अन्य गोष्टींचे विद्यापीठ नॅक पिअर कमिटीने कौतुक केले. सरकारच्या मदतीशिवाय विद्यापीठ स्वनिधीतून अनेक उपक्रम राबवत असल्याने नॅकने समाधान व्यक्त केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2021

सकाळ

डी. आर. भोसले यांनी शाहू विचार पुढे नेला

डॉ. खणे : डॉ. पोवार यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. १८ : कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले यांनी राजर्षी शाहूंचा विचार नेटाने पुढे नेला. विविध संस्थांच्या माध्यमातून तो तळागाळापर्यंत पोचवला. शाहू सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे स्पष्ट मत इतिहास संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. बी. डी. खणे यांनी व्यक्त केले.

येथील प्राचार्य डॉ. विलास पोवार लिखित 'कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले चरित्र व कार्य' या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. राजर्षी शाहू स्मारक भवनात कोरोना नियमांचे पालन करत आज हा कार्यक्रम झाला.

दरम्यान, नाशिक येथे फौजदार म्हणून रुजू झाल्यापासून ते सत्यशोधक समाज, मराठा विद्याप्रसारक समाज, कोल्हापूरचे शिक्षणाधिकारी, शहरातील विविध सहकारी संस्थांची स्थापना आदी गोष्टींवर पुस्तकांतून प्रकाश टाकला आहे.

प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील म्हणाले, "इतिहासावर आधारित कोणतेही लेखन हे पुराव्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. डॉ. पोवार यांनी डी. आर. भोसले यांचे चरित्र लिहिताना प्रत्येक गोष्टीला पुरावे दिले आहेत. नव्या पिढीने हे पुस्तक आवर्जून वाचायला हवे."

प्रा. डॉ. छाया पोवार यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे मनोगत वाचून दाखवले. डॉ. विलास पोवार यांनी पुस्तक लिखाणामागील प्रेरणा आणि एकूणच प्रवास प्रास्ताविकातून उलगडला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2021

तरुण भारत

'डेक्कन'च्या सर्टिफिकेट कोर्स इन व्हॅल्युएशन ऑफ प्रॉपर्टीसाठी प्रवेश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आजीवन अध्ययन व विस्तार विभाग या विभागामार्फत सुरु असलेल्या 'सर्टिफिकेट कोर्स इन व्हॅल्युएशन ऑफ इम्मुव्हेबल प्रॉपर्टी' हा अभ्यासक्रम डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये शिकवला जात आहे. अभ्यासक्रमाचा कालावधी ६ महिन्याचा असून आठवड्यातून २ दिवस अधिक अभ्यासक्रम शिकवला जातो. गेली १५ वर्षे अव्याहतपणे हा अभ्यासक्रम सुरु आहे.

या अभ्यासक्रमानंतर बँका, पतसंस्था व इतरत्र व्हॅल्युएअर म्हणून काम करता येते आजपर्यंत शेकडो विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. नवीन बॅच लवकरच सुरु होत असून प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. इच्छुकांनी डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉसमॉस कमर्शियल कॉम्प्लेक्स, ३ रा मजला, हॉटेल अनुग्रह शेजारी, स्टेशन रोड, कोल्हापूर येथे संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.